# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक</u>

**<u>वाचा</u>**:- १. जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक चे लघुलेखक श्रेणी- ३ या पदाच्या भरती प्रकीयेबाबत दि.१६.०७.२०२४ रोजीचे वेळापत्रक.

२. मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचे ई-मेल द्वारे पत्र दि.२६/०७/२०२४.

## <u>सूचना</u>

नामदार उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे निर्देशाप्रमाणे महाराष्ट्रातील विविध जिल्हयात लघुलेखक श्रेणी-३ या पदाची भरतीप्रक्रिया-२०२३ सुरू आहे. सदर कार्यालयाचे निर्देशाप्रमाणे नाशिक न्यायीक आस्थापनेवरील लघुलेखक श्रेणी- ३ या पदाच्या पात्र उमेदवारांच्या भरती प्रक्रियेचे वेळापत्रक दि.१६.०७.२०२४ रोजी या कार्यालयाने प्रसिध्द केलेले आहे.

नामदार उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे संदर्भ क्र.२ चे निर्देशानुसार इंग्रजी व मराठी लघुलेखन परीक्षेचा निकाल मा. उच्च न्यायलयाचे पुढील आदेश येईपर्यंत जाहीर न करणेबाबत सुचित केले आहे. तरी सदर परीक्षेचे निकाल पुढील आदेश येईपर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे. सदर लघुलेखक श्रेणी-३ भरती प्रकीयेमधील उपरोक्त चाचणीचा निकाल व पुढील परीक्षेबाबतचा कार्यक्रम जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर यथाअवकाश प्रसिध्द करण्यात येईल.

संबंधीत उमेदवारांनी सदरच्या सूचना जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक या कार्यालयाच्या सूचना फलकावर व संकेत स्थळावर वेळोवेळी पडताळुन पहाव्यात.

जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ:-

**(<u>https://nashik.dcourts.gov.in</u>)**

(श्रीचंद दौ. जगमलानी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नाशिक

जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक
दिनांक:-३१.०७.२०२४